# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

गणेशखिंड, पुणे ४११००७

# Savitribai Phule Pune University

Ganeshkhind, Pune - 411007

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

दूरध्वनी क्रमांक : ०२०-२५६२१२०५

Telephone No.: 020-25621205

ईमेल/ Email:pgadmis@pun.unipune.ac.in

शैक्षणिक प्रवेश विभाग

P.G. Admission Section

Website: www.unipune.ac.in


## परिपत्रक क्र. १२९/२०२६

**विषय : पीएच्.डी. मौखिक परीक्षा (Ph.D. Viva) Request Generate करण्यापूर्वी विद्यापीठाची मान्यता घेणेबाबत...**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठामध्ये मान्यताप्राप्त संशोधन केंद्रामधील संशोधक विद्यार्थ्यांची पीएच्.डी. मौखिक परीक्षा (Ph.D. Viva) आयोजित करताना संबंधित संशोधन मार्गदर्शक दिनांक व वेळ निवडून Request Generate करतात. सदरील Request संबंधितांच्या लॉगीनमधून मान्य झाल्यानंतर शैक्षणिक प्रवेश विभागातील संबंधित कर्मचारी पीएच्.डी. मौखिक परीक्षेकरिता संबंधित विद्यार्थ्याचे कागदपत्रांची पूर्तता, कमीत कमी दोन बहि:स्थ परीक्षकांचे प्रबंध मुल्यमापन सकारात्मक अहवाल, संशोधन मार्गदर्शकांचा प्रबंध मुल्यमापन सकारात्मक अहवाल व सह संशोधन मार्गदर्शक असल्यास त्यांचा प्रबंध मुल्यमापन सकारात्मक अहवालाची पूर्तता झाल्याची खात्री झाल्यानंतर मौखिक परीक्षा सूचनापत्र निर्गमित करतात. यामध्ये सदरील कार्यवाही करताना विद्यार्थ्यांच्या कागदपत्रांमध्ये त्रुटी, वरीलपैकी एखादा प्रबंध मुल्यमापन सकारात्मक अहवाल प्राप्त नसणे, इ. बाबी विद्यापीठाच्या निदर्शनास आल्या आहेत. यामुळे पूर्वनियोजित केलेल्या काही मौखिक परीक्षा पुढे ढकलाव्या लागतात तसेच ऑनलाईन मौखिक परीक्षेची (Ph.D. Viva) लिंक वेळेवर पाठविणे शक्य होत नाही, त्यामुळे संबंधितांना नाहक त्रास होतो.

त्याअनुषंगाने मा. विभागप्रमुख/मा.प्राचार्य/संचालक, सर्व विद्यापीठ विभाग/सर्व मान्यताप्राप्त संशोधन केंद्रे यांना कळविण्यात येते की, यापुढे संशोधन मार्गदर्शकाने पीएच्.डी. मौखिक परीक्षेकरिता Request Generate करताना खालीलप्रमाणे कार्यवाही सुरू करण्यात आली आहे.

१. संशोधन मार्गदर्शकाने पीएच्.डी. मौखिक परीक्षेकरिता Request Generate केल्यानंतर प्रथमत: शैक्षणिक प्रवेश विभागातील संबंधित कर्मचाऱ्याकडून संबंधित विद्यार्थ्याचे सर्व कागदपत्रांची पूर्तता व आवश्यक प्रबंध मुल्यमापन अहवालाची पूर्तता झाल्याची खात्री करून मान्यता प्रदान करतील.

२. सदरील मान्यता प्रदान केल्यानंतर संबंधित संशोधन मार्गदर्शकांच्या लॉगीनमधून दिनांक, वेळ व Viva Mode निवडावा.

३. सदरील पीएच्.डी. मौखिक परीक्षेची Request मा. अध्यक्ष, बहि:स्थ परीक्षक व विद्यापीठातील संबंधित मा. विभागप्रमुख यांचे मान्यतेकरिता जाईल तसेच संबंधित विद्यार्थ्यास परीक्षेचे शुल्क भरण्यास पर्याय उपलब्ध होईल.

या सर्व बाबी पूर्ण झाल्यानंतर पीएच्.डी. मौखिक परीक्षेचे सूचनापत्र (Ph.D. Viva Notice) निर्गमित करण्याची कार्यवाही करण्यात येईल. याबाबतची कार्यवाही सुलभ होण्यासाठी SoP सोबत जोडली आहे.

गणेशखिंड, पुणे )
संदर्भ : शै. प्रवेश/ 2991 )
दिनांक : 09/07/2026 )

(डॉ. मुंजाजी रासवे)
उपकुलसचिव

**प्रति :**

१. मा. विभागप्रमुख, सर्व शैक्षणिक विभाग, प्रस्तुत विद्यापीठ.
२. मा. प्राचार्य/संचालक, सर्व संलग्न महाविद्यालये/मान्यताप्राप्त संस्था, प्रस्तुत विद्यापीठ.

आपणांस विनंती सदरील परीपत्रकाचा आशय आपल्या संशोधन केंद्रातील संशोधन मार्गदर्शकांच्या निदर्शनास आणून द्यावा.

**Viva Request SoP**

- Research Supervisor generate the Viva request.
- P.G. Section verifies the request:

  *Approved*

  *Discrepancy (if any issue is found)*
- If approved, the Research Supervisor can select:

  *Viva Date*

  *Viva Time*

  *Viva Mode*
- Nomination of Chairman by HoD (External Referee in consultation with Research Supervisor)
- After submitting the Viva Date, Time, and Mode, an email notification will be automatically sent to the External Referee(s), HOD and Chairman.